# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट क्र-५८ दिनांक - २६/०२/२०२४

## घरफोडी चोरी करणाऱ्या गुजराती टोळीस अटक करुन, गुन्हे उघडकीस आणण्यात विरार पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश.

विरार पोलीस ठाणे हद्दीत दि.०९/०२/२०२४ रोजी पहाटे ०२:००वा. ते ०५:३०वा.चे दरम्यान विठ्ठल हरी टॉवर, महाविर नर्सिंग होमजवळ, विरार(प.), ता.वसई, जि.पालघर येथील तक्रारदार यांचे राहते घराचे हॉलची खिडकी कोणीतरी अज्ञात चोरटयाने उचकटून त्यावाटे घरात आत प्रवेश करुन, घरातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा मुद्देमाल घरफोडी चोरी करुन चोरुन नेले बाबत तक्रारदार- श्री.आनंद भवरलाल जैनार ,.विठ्ठल हरी टॉवर, विरार(प.), ता.वसई यांचे तक्रारीवरुन विरार पो.ठाणे, गु.रजि.नं. I १२८/२०२४, भा.दं.वि.सं. कलम-३८०,४५४,४५७,३४ प्रमाणे दि.११/०२/२०२४ रोजी गुन्हा नोंद केला आहे.

वर नमुद गुन्हयाचे अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी लागलीच घटनास्थळी भेट देवुन, मा.वरिष्ठांचे मागदर्शनाखाली चार वेगवेगळी पथके तयार करुन, गुन्हयाचे घटनास्थळाचे आजुबाजुस मिळालेल्या सी.सी.टी.व्ही. फुटेजचे आधारे संशयीत आरोपीताचा मागोवा काढत असतांना, नमुद आरोपीत हे वापी, गुजरात येथे असल्याची माहिती मिळाल्याने, लागलीच सदर ठिकाणी जावुन, गुप्त बातमीदार व तांत्रिक माहीतीच्या आधारे गुन्हयातील ०२ आरोपीतांना वापी, राज्य-गुजरात तसेच ०१ आरोपीत यास उरण, नवी मुंबई येथुन सापळा रचुन शिताफिने सराईत आरोपीत नामे. १)**दिपक भाकीयादार ऊर्फ बोबडया, वय-२८ वर्षे**, रा.उरण-मोरा रोड, उरण, जि.रायगड, २)**मोहमद तारीक खान ऊर्फ टिंकल, वय-३२ वर्षे**, रा.कब्रस्तान रोड, वापी(प.), जि.वलसाड, राज्य-गुजरात, ३)**धर्मेद्र पासवान, वय-३५ वर्षे**, रा.रजा गल्ली, छिरी, वापी(पु.), जि.वलसाड, राज्य-गुजरात, यांना ताब्यात घेवुन, त्यांना नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

नमुद आरोपीतांचे चौकशी दरम्यान त्यांचेकडून-१)एकुण-१२.५२० **ग्रॅम सोन्याचे दागिने**, २)वेगवेगळया कंपन्यांचे एकुण- **०२ मोबाईल फोन**, ३)३३,०००/- **रुपये रोख रक्कम** असा **एकुण-१,२४,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल** हस्तगत केला आहे. नमुद आरोपीत यांचेकडून खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आले आहे.

१) विरार पो.ठाणे गु.रजि.नं. I १२८/२०२४, भा.दं.वि.सं. कलम-४५४,४५७,३८०,३४ प्रमाणे, **(मुळ गुन्हा)**
२) विरार पो.ठाणे गु.रजि.नं. I १३६/२०२४, भा.दं.वि.सं. कलम-४५७,३८०,३४ प्रमाणे,

नमुद सराईत आरोपीत नामे. १)**दिपक भाकीयादार ऊर्फ बोबडया, वय-२८ वर्षे**, याचेवर गुजरात राज्यातील वेगवेगळया पोलीस ठाण्यांमध्ये विविध कलमांखाली **एकुण-१३ गुन्हे** दाखल असुन, आरोपीत नामे. २)**मोहमद तारीक खान ऊर्फ टिंकल, वय-३२ वर्षे**, याचेवर गुजरात राज्यातील वेगवेगळया पोलीस ठाण्यांमध्ये विविध कलमांखाली **एकुण- ०६ गुन्हे** दाखल आहेत.

सदरची कामगिरी श्री.सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार, श्री.रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणेचे श्री.विजय पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.सुशिलकुमार शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. ज्ञानेश फडतरे, पो.उप.निरी. अविनाश हाटखिळे, पो.हवा. सचिन लोखंडे, संदिप जाधव, विशाल लोहार, इंद्रनिल पाटील, संदिप शेरमाळे, पो.अं. संदिप शेळके, मोहसिन दिवान, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, रोशन पुरकर, दत्तात्रय जाधव, प्रफुल सोनार, तसेच पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, कार्यालयाचे पो.हवा. नामदेव ढोणे, व पो.अं.संतोष खेमनर, यांनी यशस्वीरित्या पार पाडलेली आहे.


Galaxy S23 Ultra